पुढारी MY कोल्हापूर गुरुवार, १३ ऑगस्ट २०२६

# विवेकानंद महाविद्यालयात 'बौद्धिक संपदा हक्क' विषयावर कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व संशोधन विकास कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'बौद्धिक संपदा हक्क, पेटंट, कॉपीराईट व ट्रेडमार्क अर्ज प्रक्रिया' या विषयावरील आंतरराष्ट्रीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. चीनमधील हेनान विद्यापीठाचे प्रा. शान्हू लिऊ, शिवाजी विद्यापीठाचे डॉ. डी. टी. डोंगळे आणि राजाराम महाविद्यालयाचे प्रा. डॉ. पी. यू. लांडे यांनी संशोधकांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानावरून प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी संशोधकांच्या नावीन्यपूर्ण कल्पनांना बौद्धिक संपदा हक्कांचे संरक्षण मिळवून देण्यासाठी अशा कार्यशाळा महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. कार्यशाळेत पेटंट, कॉपीराईट, ट्रेडमार्क व अर्ज प्रक्रियेचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले. डॉ. शुभांगी काळे व डॉ. संजय लट्ठे यांनी केले. डॉ. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. बी. टी. दागंट यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अतिश पाटील यांनी आभार मानले.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा
• कोल्हापूर, गुरुवार
दि. १३ ऑगस्ट २०२६

# डिजिटल युगात डॉ. रंगनाथन यांचे विचार मोलाचे : प्रा. हुजरे

कोल्हापूर : ई पुस्तके, डिजिटल ग्रंथालये, ऑनलाईन डेटाबेस, कृत्रिम बुध्दिमत्ता आणि माहिती तंत्रज्ञानाच्या युगात डॉ. रंगनाथन यांचे विचार अत्यंत मोलाचे आहेत. ग्रंथालये साचेबद्ध शास्त्रीय चाकोरीत डॉ. रंगनाथन यांच्यामुळे आली. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी केले. डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंती निमित्त ग्रंथालयाच्या वतीने आयोजित ग्रंथ प्रदर्शनात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. ग्रंथ प्रदर्शनाचे उदघाटन त्यांच्या हस्ते झाले. ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन म्हणून युनिक अँकेडेमीचे सदस्य कैलास भालेकर यांनी मार्गदर्शन केले. चंद्रकांत खरात, करिअर कौन्सिलींग सेलच्या प्रमुख डॉ. राजश्री पाटील, ग्रंथपाल डॉ. नीता पाटील यांनी संयोजन केले. सूत्रसंचालन डॉ. मृणालिनी देसाई आणि डॉ. केतकी पाटील यांनी केले.